पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/२३/२०१९
दिनांक-२४/०१/२०१९

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी, पुणे-३९

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
मासिक सभेचे वेळी आपले विभागाशी संबंधीत विषयाबाबत सविस्तर टिपण/माहितीसह उपस्थित राहावे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## इ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ११

**दिनांक- ०१/०२/२०१९ रोजी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०१/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०४/०१/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १०) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र. १-** कोटेशन नोटीस क्र.२ सन २०१८-२०१९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता नव्याने पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी यांना महाराष्ट्र शासनाचा "ब" दर्जा प्राप्त असून त्यांना अनुदान प्राप्त होत असल्याने दरवर्षी पुस्तके/ग्रंथ खरेदी करणे आवश्यक आहे. वाचकांच्या व सभासदांच्या आवडीनुसार कथा, कांदब-या, ललितलेख, ऐतिहासिक, विनोदी, आरोग्य, काव्य, धार्मिक विषयाच्या पुस्तकांची किंवा ग्रंथांची खरेदी करण्यात येते. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरीता **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षावर सुधारीत तरतूद र.रु.३,००,०००/- इतकी रक्कम असून त्यातून श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे व नियतकालिके खरेदी करण्यात येतात. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता कोटेशन नोटीस क्र.२ जा.क्र. भैसावा/७/ कावि/६२/२०१८, दिनांक१२/१२/२०१८ अन्वये कोटेशन नोटीस म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सोबतचे प्रपत्र "अ" नुसार दरपत्रक मागविले असता ३ पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झाले असून अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांनी १६.५० % सुट दिली आहे. त्यानुसार अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांचेकडून अटी व शर्तीनुसार श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरीता ७०० पुस्तके/ग्रंथ खरेदी करणेकामी १६.५० % सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेली आहे. सदरचा खर्च **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. तरी अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७. यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरीकरीता ७०० पुस्तके/ग्रंथांच्या र.रु. १,२५,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख पंचवीस हजार फक्त) च्या एकूण किंमतीवर १६.५० % सुट देऊन येणा-या किंमतीची पुस्तके खरेदी करावयाच्या खर्चास मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेकामी सदरचा विषय नजिकच्या मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र. २-** कोटेशन नोटीस क्र.३ सन २०१८-२०१९ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र भोसरीकरीता नव्याने पुस्तके खरेदी करणेकामी मा.प्रभाग समितीच्या मान्यतेकामी ठेवणेबाबत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी येथील विद्यार्थ्यांना MPSC, UPSC तसेच विविध स्पर्धा परीक्षांना उपयुक्त अशी व विद्यार्थ्यांनी मागणी केलेली १०७ पुस्तके खरेदी करणेत येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रशासकीय व कार्यालयीन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने प्रशासनाकडील जा.क्र. प्रशा/०२/कावि/७१७/२०१७ दिनांक २९/०९/ २०१७ अन्वये सार्वजनिक वाचनालये व प्रेक्षागृहे यांचे कामकाज स्वतंत्रपणे न ठेवता भौगोलिक क्षेत्रानुसार भोसरी येथील श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र इ क्षेत्रीय अधिका-यांच्या नियंत्रणाखाली देणेबाबतचा आदेश निर्गत करण्यात आला आहे. त्यानुसार इ क्षेत्रीय कार्यालया मार्फत सार्वजनिक वाचनालयाकरीता सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरीता **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षावर सुधारीत तरतूद र.रु.३,००,०००/- इतकी रक्कम असून त्यातून श्री.भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय व भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र करीता ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे व नियतकालिके खरेदी करण्यात येतात. इ क्षेत्रीय कार्यालयामार्फत भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र भोसरीकरीता कोटेशन नोटीस क्र.३ जा.क्र. इक्षेका/ भोस्पपकें/कावि/ ६४/२०१८, दिनांक १२/१२/२०१८ अन्वये कोटेशन नोटीस म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सोबतचे प्रपत्र "अ" नुसार दरपत्रक मागविले असता ३ पुरवठाधारकांकडून कोटेशन प्राप्त झाले असून अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांनी १७ % सुट दिली आहे. त्यानुसार अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७ यांचेकडून अटी व शर्तीनुसार भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी करीता १०७ पुस्तके खरेदी करणेकामी १७ % सुट दिल्याने त्यांचे दरपत्रक स्विकारण्यात आलेले आहे. सदरचा खर्च **"पुस्तके व नियतकालिके खरेदी"** या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे . तरी अनुजा एंटरप्रायजेस, रहाटणी, पुणे – १७. यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे भोसरी स्पर्धा परीक्षा केंद्र, भोसरी करीता १०७ पुस्तकांच्या र.रु ४७,५००/- ( अक्षरी र.रु.सत्तेचाळीस हजार पाचशे फक्त) च्या एकूण किंमतीवर १७ % सुट देऊन येणा-या किंमतीची पुस्तके खरेदी करावयाच्या खर्चास मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेकामी सदरचा विषय नजिकच्या मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिति
भोसरी, पुणे-३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/ २३/२०१९
दिनांक- २४/०१/२०१९